# वैध मापनशास्त्र यंत्रणा जिल्हा लातुर व उस्मानाबाद आपले स्वागत करत आहे

# शारदीय नवरात्र महोत्सव

# तुळजाभवानी मंदिर, तुळजापुर

## वैध मापनशास्त्र यंत्रणेचे नियोजन

# वैध मापनशास्त्र यंत्रणा

ग्राहक संरक्षणः ग्राहकाने वस्तु खरेदी करताना जे मुल्य दिलेले आह त्याबदल्यात योग्य वजनात वा मापात वस्तु मिळणे हा ग्राहकाचा हक्क आहे.

वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत कायदा व त्याखालील नियम यांची अंमलबजावणी करुन ग्राहकांच्या हिताचे रक्षण केले जाते.

प्रामुख्याने वजनात किंवा मापात माल/वस्तु कमी देणे,

छापील किंमतीपेक्षा जास्त दराने आवेष्टीत वस्तुंची विक्री करणे,

छापील किंमतीत खाडाखोड करुन ग्राहकाची फसवणुक करणे

इत्यादींबाबत कारवाई करुन ग्राहक हिताचे संरक्षण केले जाते.

## अधिनियम (कायदा) व नियम :

वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९

वैध मापनशास्त्र (आवेष्टीत वस्तु) नियम, २०११

वैध मापनशास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११

महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११

# वजन वा मापासंबंधी खरेदी करताना घ्यावयाची काळजी

१. वजन वा मापावर वैध मापनशास्त्र विभागाचा शिक्का आहे काय ?
(वजनाच्या खालील भागात व मापाच्या दर्शनी भागात वर्ष व तिमाहीचा शिक्का असणे अनिवार्य आहे)

२. इलेक्ट्रॉनिक काटयाला वैध मापनशास्त्र विभागाचे सील केलेले व त्यावर वर्ष व तिमाहीचा शिक्का आहे काय ?
(इलेक्ट्रॉनिक काटयास तारेमध्ये लावलेल्या सीलवर वर्ष व तिमाहीचा शिक्का अनिवार्य आहे)

३. दुकानदाराकडे या विभागाकडुन दिले जाणारे वजन, माप वा काटयाचे पडताळणी प्रमाणपत्र आहे काय ?

४. वजन वा मापाने केलेल्या खरेदीमध्ये ठरलेल्या मापापेक्षा कमी माल मिळाला आहे काय ?
(मिठाईसाठी वापरल्या जाणा-या बॉक्सचे वजन निव्वळ वजनात समाविष्ट नसते. फक्त मिठाईच्या वजनाचे पैसे द्या)

५. गॅस सिलेंडरचे वजन मोजण्यासाठी गॅस एजन्सीकडे वा डिलिव्हरी करणा-या वाहनासोबत वजनकाटा उपलब्ध आहे काय ? भरलेल्या सिलेंडरचे वजन बरोबर आहे काय ?

६. पेट्रोल/डिझेल पंपावर इंधनाच्या वितरणाच्या तपासणीसाठी ५ लिटरचे प्रमाणित माप आहे काय ?
इंधनाच्या डिलिव्हरीबाबत शंका असल्यास पंपावर उपलब्ध ५ लिटरच्या मापाने डिलिव्हरी तपासुन घ्या.

## आवेष्टीत वस्तु खरेदी करताना खालील बाबी नक्कीच पहा

१. उत्पादक वा आवेष्टकाचे नाव व पत्ता

२. आवेष्टीत वस्तुचे सामान्य नाव

३. निव्वळ वजन वा परिमाण वा संख्या

४. उत्पादनाचा वा आवेष्टनाचा महिना व वर्ष

५. किरकोळ विक्री किंमत (रुपयात व सर्व करांसहित)

६. उत्पादकाच्या ग्राहक सेवा केंद्राच्या प्राधिका-याचे नाव, पत्ता, मदत/सेवा क्रमांक व ई मेल ॲड्रेस

७. छापील किरकोळ विक्री किंमतीपेक्षा जास्त किंमत घेतली आहे काय ?

८. छापील किरकोळ विक्री किंमत खोडलेली आहे अथवा कमी असलेली विक्री किंमत खोडुन जास्तीची विक्री किंमत छापलेली/लिहिलेली आहे काय ?

# यंत्रणे अंतर्गत तक्रार निवारण्याची व्यवस्था

ग्राहकास खरेदी करताना जर या विभागाच्या अखत्यारीत येणा-या बाबींचे उल्लंघन आढळल्यास तक्रार करण्यासाठी यंत्रणेच्या तक्रार निवारण कक्षास खालीलपैकी कोणत्याही उपलब्ध मार्गाने संपर्क करुन ग्राहक आपली तक्रार नोंदवु शकतात.

तक्रारीसाठी दुरध्वनी क्रमांकः ०२२ - २२८८६६६६ (कार्यालयीन वेळेत)

वाटसअॅप क्रमांकः ०९८६९६९१६६६

ई मेल : dclmms_complaints@yahoo.in

फेसबुकः Legal Metrology Maharashtra Consumer Grievances

तक्रारीमधे दुकानाचे नाव, पुर्ण पत्ता व उल्लंघनाबाबत तपशिल देणे अपेक्षित आहे.

उस्मानाबाद व लातुर जिल्हाः०२३८२ २४५२०७, ईमेलः aclmlatur@yahoo.in

# यंत्रणे अंतर्गत व्यवस्था

तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदरील तक्रार संबंधित संबंधित विभागातील निरीक्षकाद्धारे सदरच्या आस्थापनेची तपासणी केली जाईल. तपासणीमध्ये उल्लंघन आढळल्यास त्यांचेविरुध्द तात्काळ गुन्हा नोंदविला जाईल

तसेच, या यंत्रणेकडुन अचानक भेटी देऊन दुकानांची कायदा व नियमांच्या उल्लंघनाबाबत तपासणी केली जाईल आणी

नवरात्र महोत्सवाच्या पहिल्या दिवशी वैध मापनशास्त्र यंत्रणेबाबतची माहिती दर्शवणारे फलक, पत्रके इत्यादी दर्शवुन ग्राहक जाग्रती करण्यात येईल.

फलक व पत्रकाचे नमुने पुढील स्लाईडसमधे ...

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

# वैध मापनशास्त्र यंत्रणा

## लातूर व उस्मानाबाद जिल्हे


मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७

Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410


## दाम पुरे मग वजन का अपुरे ?






**मिठाई खरेदी करतांना डब्याचे वजन त्यात समाविष्ट नाही याची खात्री करा.**

पंपाच्या दर्शकावर डिस्प्ले 00 असल्याची खात्री करुनच पेट्रोल/डिझेल खरेदी करा








पंपाच्या अचूकतेची खात्री करण्यासाठी पंपावर ठेवलेल्या ५ लिटरच्या प्रमाणित मापाद्वारे डिलेव्हरीची खात्री करुन शकता तो तुमचा अधिकार आहे.

**नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६**

Email:dclmms@yahoo.in


अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

वैध मापनशास्त्र यंत्रणा

लातूर व उस्मानाबाद जिल्हे

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७

Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410


## उपभोक्ता कायदा करतो तुमच्या समस्याचे समाधान

## कमाल किरकोळ विक्रीच्या किंमतीपेक्षा जादा का देता ?




तुम्ही कमाल किरकोळ विक्री किंमतीवर बार्गेनिंग करु शकता हा तुमचा अधिकार आहे.

ग्राहक तक्रारीसाठी
Whats App No. 9869691666

## नेहमी आवेष्टित वस्तूवरील उदघोषणा काळजीपूर्वक पहा.




**भेसळयुक्त , नकली आणि बनावट सामाना विरुध्द आम्ही सदैव लढू...**

*आम्ही जाहीरातीने भ्रमीत होत नाहीत
*आम्ही अधिकतम रकमेपेक्षा जास्त रक्कम देत नाही
*आम्ही वस्तू वरील ISI मार्क पाहूनच वस्तू घेतो.
* आम्ही विकत घेतलेल्या वस्तुचे बिल घेतो


नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६

Email:dclmms@yahoo.in

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

वैध मापनशास्त्र यंत्रणा

लातूर व उस्मानाबाद जिल्हे

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७

Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410





## एक ग्राहक म्हणून आपल्या अधिकाराबद्दल जागरुक रहा

* तुम्ही मालाविषयी किंवा सेवेविषयी समाधानी नसाल तर पॅकेटवरील ग्राहक तक्रार निवारण क्रमांकावर संपर्क साधू शकता.
* पॅकेजवरील वजनाविषयी तुम्ही अधिक माहीती घेवू शकता व दुकानदाराकडे उपलब्ध असलेल्या तोलन उपकरणावर वजन तपासू शकता हा तुमचा आधिकार आहे.


नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६

Email:dclmms@yahoo.in

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

# वैध मापनशास्त्र यंत्रणा

## लातूर व उस्मानाबाद जिल्हे

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७
Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410

## जागो ग्राहक जागो

आवेष्टित वस्तु खरेदी करतांना खालील माहिती घोषित केलेली आहे याची खात्री करुन घ्या.

१. उत्पादकाचे वा आवेष्टकाचे अथवा आयातदाराचे संपूर्ण नाव व पत्ता
२. वस्तुचे नाव
३. निव्वळ वजन किंवा परिमाण अथवा संख्या
४. अधिकतम किरकोळ विक्री किंमत रुपये (सर्व करांसह)
५. उत्पादन/पॅकींगची तारीख महिना व वर्ष
६. ग्राहक संपर्क दुरध्वनी क्रं. आणि ई-मेल पत्ता



## गॅस सिलेंडर खरेदीच्या वेळी घ्यावयाची काळजी

१. प्रत्येक गॅस सिलेंडरवर त्याचे वजन लिहीलेले असते. उदा. १६.२. कि. ग्रॅ.

२. प्रमाणित तोलन उपकरणावर सिलेंडरच्या एकुण वजनातुन सिलेंडरचे वजन वजा केल्यानंतर घरगुती वापराच्या सिलेंडर मधील गॅसचे निव्वळ वजन १४.२किग्रॅ असल्याची खात्री करुन घ्यावी. (३०.४-१६.२ =१४.२ किग्रॅ.)




३. डिलेव्हरी बॉयकडे प्रमाणित तोलन उपकरण असणे बंधनकारक आहे.

**नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६**
Email:dclmms@yahoo.in

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
वैध मापनशास्त्र यंत्रणा
लातूर व उस्मानाबाद जिल्हे
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७
Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410

## थांबा, पहा व खरेदी करा

सोने, चांदी व मौल्यवान खडे इ. व्यवहारामध्ये वर्ग १ किंवा वर्ग-२ चे तोलन उपकरणे वापरले जात असल्याची तसेच तोलन उपकरण व वजने प्रमाणित असल्याची खात्री करुनच खरेदी करा.





## जागरुकता हीच काळाची गरज

दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तु खरेदी करण्यापूर्वी सर्व वजने, काटे, मापे व तोलन उपकरणे इ. प्रमाणित केल्याचा शिक्का असल्याची तसेच इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरण सील असल्याची खात्री करुन घ्या.



**नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६**
Email:dclmms@yahoo.in

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
वैध मापनशास्त्र यंत्रणा
लातूर व उस्मानाबाद जिल्हे
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, शिवाजी चौक, लातूर फोन ०२३८२-२४५२०७
Website : Legalmetrology.maharashtra.gov.in Email:aclmlatur@yahoo.in 9423251410

## रॉकेल खरेदीच्या वेळी खालील काळजी घ्याव्यात

१ रॉकेल चे माप हे व्यवस्थीत आहे की कोठे दबलेले ते काळजी पुर्वक पाहावे.
२.मापात रॉकेल आहे की फेस याची खात्री करुन घ्यावी.
३.रॉकेल घेत असताना माप फेसाने भरलेले नाही याची खात्री करुन घ्यावी.





## थांबा नियमबाह्य मापाने खरेदी करु नका

खालील सर्व मापे ही नियम बाह्य आहेत असा प्रकार आढळल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा



शेर मापटे गोल दांडी

**नियंत्रण कक्ष दुरध्वनी क्रं. ०२२-२२८८६६६६**
Email:dclmms@yahoo.in

महाराष्ट्र शासन

# सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशास्त्र

(जिल्हा लातुर व उस्मानाबाद)

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जि. प. जवळ, लातुर

ईमेल: aclmlatur@yahoo.in दुरध्वनी: ०२३८२ - २४५२०७

## वजन वा मापासंबंधी खरेदी करताना खालील बाबींची काळजी घ्या

१. वजन वा मापावर वैध मापनशास्त्र विभागाचा शिक्का आहे काय ?

(वजनाच्या खालील भागात व मापाच्या दर्शनी भागात वर्ष व तिमाहीचा शिक्का असणे अनिवार्य आहे)

२. इलेक्ट्रॉनिक काटयाला वैध मापनशास्त्र विभागाचे सील केलेले व त्यावर वर्ष व तिमाहीचा शिक्का आहे काय ?

(इलेक्ट्रॉनिक काटयास तारेमध्ये लावलेल्या सीलवर वर्ष व तिमाहीचा शिक्का अनिवार्य आहे)

३. दुकानदाराकडे या विभागाकडुन दिले जाणारे वजन, माप वा काटयाचे पडताळणी प्रमाणपत्र आहे काय ?

४. वजन वा मापाने केलेल्या खरेदीमध्ये ठरलेल्या मापापेक्षा कमी माल मिळाला आहे काय ?

(मिठाईसाठी वापरल्या जाणा-या बॉक्सचे वजन निव्वळ वजनात समाविष्ट नसते. फक्त मिठाईच्या वजनाचे पैसे द्या)

५. गॅस सिलेंडरचे वजन मोजण्यासाठी गॅस एजन्सीकडे वा डिलिव्हरी करणा-या वाहनासोबत वजनकाटा उपलब्ध आहे काय ? भरलेल्या सिलेंडरचे वजन बरोबर आहे काय ?

६. पेट्रोल/डिझेल पंपावर इंधनाच्या वितरणाच्या तपासणीसाठी ५ लिटरचे प्रमाणित माप आहे काय ? इधनाच्या डिलिव्हरीबाबत शंका असल्यास पंपावर उपलब्ध ५ लिटरच्या मापाने डिलिव्हरी तपासुन घ्या.

## आवेष्टीत वस्तु खरेदी करताना खालील बाबी नक्कीच पहा

१. उत्पादक वा आवेष्टकाचे नाव व पत्ता

२. आवेष्टीत वस्तुचे सामान्य नाव

३. निव्वळ वजन वा परिमाण वा संख्या

४. उत्पादनाचा वा आवेष्टनाचा महिना व वर्ष

५. किरकोळ विक्री किंमत (रुपयात व सर्व करांसहित)

६. उत्पादकाच्या ग्राहक सेवा केंद्राच्या प्राधिका-याचे नाव, पत्ता, मदत/सेवा क्रमांक व ई मेल ॲड्रेस

७. छापील किरकोळ विक्री किंमतीपेक्षा जास्त किंमत घेतली आहे काय ?

८. छापील किरकोळ विक्री किंमत खोडलेली आहे अथवा कमी असलेली विक्री किंमत खोडुन जास्तीची विक्री किंमत छापलेली/लिहिलेली आहे काय ?

वरीलपैकी कोणत्याही बाबीचे उल्लंघन आढळल्यास या कार्यालयाच्या वरील नमुद दुरध्वनी क्रमांकावर अथवा ईमेल ॲड्रेस वा वरील पत्त्यावर तक्रार करा.

**महाराष्ट्र राज्यासाठी मध्यवर्ती ग्राहक तक्रार क्रमांक : ०२२ - २२८८६६६६**

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## वैध मापनशास्त्र यंत्रणा

**हे ग्राहकराजा... तु ग्राहक शिक्षणाचा व माहिती मिळविण्याचा हट्ट धर !**

**वैध मापनशास्त्र यंत्रणा,लातुर व उस्मानाबाद जिल्हयामधील निरीक्षक कार्यालये व त्यांची कार्यक्षेत्र**

| कार्यालयाचे नाव | पत्ता | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| निरीक्षक,वैध मापनशास्त्र, लातुर- १विभाग | मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद कंपाउंड,लातुर,ता.जि.लातुर | लातूर मधील काही भाग व रेणापुर तालुका, मुरुड |
| निरीक्षक,वैध मापनशास्त्र, लातुर-२ | मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जिल्हा परिषद कंपाउंड,लातुर,ता.जि.लातुर | लातुर मधील काही भाग व चाकुर तालुका,अहमदपुर तालुका |
| निरीक्षक, वैध मापनशास्त्र, औसा विभाग | मध्यवर्ती प्रशसकीय इमारत, तहसिल शेजारी,मेन रोड, औसा,ता. औसा जि.लातूर | औसा तालुका ,निलंगा तालुका व शिरुर अनंतपाळ तालुका |
| निरीक्षक, वैध मापनशास्त्र, उदगीर विभाग | सोमनाथपुर, उदगीर,,ता उदगीर,जि. लातुर | उदगीर तालुका ,जळकोट तालुका व देवणी तालुका |
| निरीक्षक, वैध मापनशास्त्र, उस्मानाबाद विभाग | महाजन बिल्डींग, समर्थनगर उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद | उस्मानाबाद तालुका |
| निरीक्षक,वैध मापनशास्त्र, भुम विभाग | पोस्ट ऑफिसशेजारी, भुम, ता. भुम, जि. उस्मानाबाद | भुम तालुका, वाशी तालुका, कळंब तालुका, परंडा तालुका |
| निरीक्षक,वैध मापन शास्त्र, तुळजापुर विभाग | प्रशांत जगताप यांची बिल्डींग, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शेजारी, तुळजापुर | तुळजापुर तालुका, लोहारा तालुका व उमरगा तालुका |

**वैध मापनशास्त्र यंत्रणेचे लातुर व उस्मानाबाद जिल्हयाचे मध्यवर्ती कार्यालय**

| कार्यालयाचे नाव | पत्ता व दुरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जिल्हा लातुर व उस्मानाबाद | मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जिल्हा परिषद कंपाऊंड,लातुर ०२३८२-२४५२०७ Email: aclmlatur@yahoo.in | लातुर व उस्मानाबाद, जिल्हे |

**वैध मापनशास्त्र यंत्रणेचे औरंगाबाद विभागाचे मध्यवर्ती कार्यालय**

| कार्यालयाचे नाव | पत्ता व दुरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| उपनियंत्राक,वैध मापनशास्त्र, औरंगाबाद विभाग | घर नं.२-५-८८/२, डॉ. पेंडकर हॉस्पिटलच्या मागे, जुबली पार्क,औरंगाबाद ०२४०-२३३९६५६ Email: dyclmaurangabad@yahoo.in | प्रादेशिक विभाग, औरंगाबाद |

**वैध मापनशास्त्र यंत्रणेची महाराष्ट्र राज्याचे मध्यवर्ती कार्यालय**

| कार्यालयाचे नाव | पत्ता व दुरध्वनी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| नियंत्राक, वैध मापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य | कुटीर क्र.७ फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई-४०००२१ ०२२-२२०४५७०६ Email: dclmms@yahoo.in/dclmms_complaints@yahoo.com | महाराष्ट्र राज्य |

**महाराष्ट्र राज्यातील ग्राहकांच्या तक्रारींसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षाचा**
दुरध्वनी क्रमांक. ०२२-२२८८६६६६ व व्हॉटस ॲप क्रं. ९८६९६९१६६६

**लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्राहकांच्या तक्रारींसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षाचा**
दुरध्वनी क्रमांक. ०२३८२-२४५२०७ व व्हॉटस ॲप क्रं. ९४२३२५१४१०

स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर

बेटी बचाओ — save the girl child

**सर्वांनी हे पत्रक कायमस्वरुपी संग्रही ठेवावे.**

**हे ग्राहकराजा ... तू अन्यायाविरुध्द तक्रार कर !**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
# वैध मापनशास्त्र यंत्रणा
### लातूर व उस्मानाबाद जिल्हे
Website : Legalmetrology.maharashtra.gov.in

# ग्राहक जागृती अभियान

* महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयांतर्गत वैध मापनशास्त्र विभाग कार्य करतो. वैध मापनशास्त्र विभागाचे काम ग्राहक संरक्षणाचे आहे. ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विविध कायदे व नियम अस्तित्वात आहेत. ग्राहकाने वस्तु खरेदी करण्यासाठी जे मुल्य दिलेले आहे त्याच्या बदल्यात योग्य वजनात व मापात वस्तु मिळणे हा ग्राहकाचा कायदेशीर अधिकार वा हक्क आहे.
* वैध मापनशास्त्र विभागाचे कामकाज खालील अधिनियम (कायदा) व नियमांनुसार चालते.
  १. वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९
  २. वैध मापनशास्त्र (आवेष्टीत वस्तु) नियम, २०११
  ३. वैध मापनशास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११
  ४. महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११
* वजन माप विषयक कायदे ग्राहक संरक्षणासाठी अंमलात आलेले आहेत. त्या दृष्टीकोनातून आपल्या विभागाचे निरीक्षक, वैध मापनशास्त्र कार्यालय कुठे आहे ते जाणुन घ्या.
* वजने, मापे, तोलन व मापन उपकरणे यांच्या अचुकतेसाठी व्यवहारात उपयोगात येणारी सर्व वजने, मापे, तोलन व मापन उपकरणे यांची नियतकालिक पडताळणी व मुद्रांकन करणे बंधनकारक आहे. सदरची पडताळणी करण्यासाठी निरीक्षक, वैध मापनशास्त्र यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.
* वजने, मापे, तोलन व मापन उपकरणांची पडताळणी केल्याबाबतचा शिक्का आहे की नाही हे नक्कीच पहा. शिक्का असल्यास सदरील वजने, मापे, तोलन व मापन उपकरणांची अचुकता तपासुन प्रमाणित करण्यात आलेली असते व वजनाच्या खालील भागास, मापाच्या दर्शनी भागास, तराजुच्या दांडीवर व इलेक्ट्रॉनिक काट्याला लावलेल्या तारेच्या मधील सीलवर वैध मापनशास्त्र विभागाचा मुद्रांकन ठसा उमटविला जातो.
  शिक्क्याचा तपशिल : प्रत्येक वजन, माप, तोलन वा मापन उपकरणाच्या पडताळणीनंतर त्यावर निरीक्षक, वैध मापनशास्त्र हे तीन शिक्के मुद्रांकित करतात.
  १. निरीक्षक, वैध मापनशास्त्र यांचा ओळखठसा क्रमांक
  २. मुद्रांकनाचे वर्ष
  ३. मुद्रांकनाची तिमाही : वर्षातील सलग तीन महिन्यास तिमाही म्हणतात. म्हणजेच
  जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यांमध्ये - A
  एप्रिल, मे व जुन महिन्यांमध्ये - B
  जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांमध्ये - C
  ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांमध्ये - D
* वजने, मापे, तोलन व मापन उपकरणांच्या पडताळणी व मुद्रांकनासाठीची विहित मुदत खालीलप्रमाणे आहे.
  १. वजने, क्षमता मापे, लांबी मापे, टेप, दांडी तराजु व फलकयंत्र इ. ची २४ महिन्यातुन एकदा
  २. साठवणुक टाकी ६० महिन्यातून एकदा
  ३. इतर सर्व वजन मापे १२ महिन्यातून एकदा पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे बंधनकारक आहे.

**“आपली जागरुकता... आपलेच हित ”**

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## वैध मापनशास्त्र यंत्रणा

### हे ग्राहकराजा... तु निवडीचा व सुरक्षिततेचा हट्ट धर!

※ ग्राहकाने वस्तु खरेदी करण्यासाठी जे मुल्य दिलेले आहे त्याच्या बदल्यात योग्य वजनात व मापात व संख्येत वस्तु बरोबर मिळते किंवा नाही याची खात्री करुन घ्या. उदा. मिठाई खरेदी करताना मिठाईचे वजन बॉक्ससहित केले जात नाही याची काळजी घ्या. खरेदी केलेली वस्तु वजनात/मापात/संख्येत कमी देणे कायद्यानुसार गुन्हा आहे.

※ व्यापाऱ्याने दांडीचा तराजु स्टँडला किंवा साखळीला आकड्याने टांगुन ठेवणे बंधनकारक आहे. (फिरत्या विक्रेत्याला हा नियम लागू नाही). वजनकाट्याद्वारे वजन होताना आपले पुर्ण लक्ष असु द्या अन्यथा व्यापारी त्यांच्या फायद्यासाठी हातचलाखीने आपणास कमी माल देण्याचा संभव असतो.

※ व्यापाऱ्यांनी त्यांचेकडील वजनमापांचा स्वच्छ अवस्थेत आणि योग्य त्या प्रकाश व्यवस्थेत वापर करणे बंधनकारक आहे. तसेच व्यापाऱ्यांनी वजनकाटा अशा रितीने ठेवावा की, ग्राहक हा वजन करण्याची प्रक्रिया स्पष्टपणे पाहु शकेल.

※ वस्तुची खरेदी करताना पाव किंवा पाऊण या परिमाणाऐवजी २०० ग्रॅम किंवा २०० मिली किंवा यासारख्या दशमान परिमाणातच खरेदीची मागणी करा. तसेच अमुक एका रकमेची वस्तु खरेदी करण्यापेक्षा अमुक एका निश्चित परिमाणात खरेदी करा. उदा. २०० ग्रॅम वस्तु मागा परंतु दहा रुपयांच्या वस्तुची मागणी करु नका.

※ वजन करण्याची रीत समजून घ्या आणि आपण खरेदी केलेल्या वस्तुंचे वजन करताना निरीक्षण करा. वस्तु खरेदी करतांना खालील बाबींची खात्री करुन घ्या.

अ) तराजुचा दर्शक (इंडिकेटर) त्याच्या मध्यावर स्थिरावतो व इलेक्ट्रॉनिक काट्याचा दर्शक शून्य दर्शवितो.

ब) पेट्रोल वा डिझेल खरेदी करताना दर्शक (इंडिकेटर) शुन्य दर्शवितो.

क) रॉकेल मापात घेतल्यावर फेस जाऊन ते स्थिर झाल्यावर मापाच्या मानेजवळील (वरील निमुळत्या बाजुस) छिद्रापर्यंत असल्याची खातरजमा करा अन्यथा रॉकेल कमी मिळण्याची शक्यता असते.

ड) मापाचा तळ खालुन ठोकलेला नाही तसेच तळाच्या आधारपट्ट्यातही व्यवस्थित आहेत याची खात्री करा.

इ) वजनाच्या तळामध्ये व मापाच्या मानेवरील शिसावर वैध शिक्का आहे याची खात्री करा.

※ अप्रमाणित मानकाने खरेदी करु नका. उदा.  फुट, इंच, वार, यार्ड, एकर, आदली, पायली, शेर, पौंड, तोळा इ. बेकायदेशीर एकक वा मानके आहेत. अशा एककामध्ये विक्री करणे बेकायदेशीर आहे. तसेच अप्रमाणित परिमाणातून दर सांगणे, निविदा मागवणे, रोखीच्या पावत्या देणे, जाहिराती देणे हा गुन्हा आहे.

※ प्रमाणित मानकानेच खरेदी करा. आपली खरेदी ग्रॅम, किलोग्रॅम, मिलीलिटर, लिटर, मिलीमिटर, मीटर, स्क्वेअर मीटर इ. एककाने वा मानकानेच करावी.

※ रद्दी विकताना ती घेणाऱ्याकडे पडताळणी व मुद्रांकित केलेली वजने व तराजु आहेत याची खात्री करा. गोलदांडी तराजु व पॉकेट ताण काटा वापरणे हा गुन्हा असुन अनुक्रमे हातचलाखी करुन व स्प्रिंग ताणुन वजनात फसवणुक केली जाते त्यामुळे त्याचा वापर केला जात नाही याकडे लक्ष द्या.

※ एल पी जी गॅसचे सिलेंडर स्विकारताना त्याचे सील व्यवस्थित आहे की नाही हे पहा. आपणास शंका वाटल्यास सिलेंडर स्विकारण्याअगोदर गॅस वितरकास वा घरपोच डिलिव्हरी देणाऱ्या व्यक्तीला त्याचे वजन करावयास लावा. गॅस वितरकाकडे वा गॅस सिलेंडरची घरपोच डिलिव्हरी देणाऱ्या व्यक्तीकडे वजनकाटा ठेवणे बंधनकारक आहे. प्रत्येक गॅस सिलेंडरवर रिकाम्या सिलेंडरचे वजन उमटविलेले असते अथवा छापलेले असते आणि गॅसचे वजन डिलिव्हरी चलनावर म्हणजेच पावतीवर दिलेले असते. वजनकाट्यावर तपासल्यानंतर एकुण वजन गॅसचे पावतीवरील वजन व रिकाम्या सिलेंडरचे सिलेंडरवरील नमुद वजन यांच्या बेरजेइतके आहे की नाही हे तपासुन घ्या.

**हे ग्राहकराजा...तू वस्तू व सेवा यांच्या किमतीचा व दर्जाचा आग्रह धर!**

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
## वैध मापनशास्त्र यंत्रणा

### हे ग्राहकराजा... तू अन्यायाविरुध्द तक्रार कर!

※ पेट्रोल/डिझेल पंपावर इंधनाच्या योग्य वितरणाची खात्री करण्यासाठी पंपावर ५ लिटर किंवा १० लिटरचे प्रमाणित माप ठेवणे बंधनकारक आहे. पंपातुन होणाऱ्या वितरणाची अचुकता तपासणी करण्याचा ग्राहकाचा हक्क वा अधिकार आहे.

※ व्यापाऱ्यांकडील तराजु वा इलेक्ट्रॉनिक काट्याची अचुकतेची खात्री होण्यासाठी प्रत्येक तोलन उपकरणांच्या ठिकाणी उपकरणाच्या अधिकतम क्षमतेच्या एक दशांशपट किंवा एक हजार किलो यापैकी जे कमी असेल त्या क्षमतेची पडताळणी व मुद्रांकित केलेली वजने ठेवणे बंधनकारक आहे. तोलन उपकरणांच्या अचुकतेची तपासणी करण्याचा ग्राहकाचा हक्क वा अधिकार आहे.

※ सोने चांदीच्या व्यापाऱ्याकडे अधिक अचुकतेचा वजनकाटा असणे बंधनकारक आहे.

### आवेष्टीत (पॅकबंद) वस्तु नियम

※ कोणतीही आवेष्टीत वस्तु ग्राहकाच्या अपरोक्ष आवेष्टीत करुन विक्री करण्यात येते. अशा वस्तुंवर उत्पादकाने/आवेष्टकाने खालील मुलभूत बाबींचा सदर आवेष्टीत वस्तुवर ठळक ठिकाणी उल्लेख करणे बंधनकारक आहे.

१) उत्पादकाचे/आवेष्टकाचे/आयात करणाऱ्याचे नाव व पुर्ण पत्ता

२) आवेष्टीत वस्तुचे सामान्य वा प्रचलित नाव

३) आवेष्टीत वस्तुचे निव्वळ वजन वा परिमाण वा संख्या

४) उत्पादनाचा वा आवेष्टनाचा महिना व वर्ष

५) अधिकतम किरकोळ किंमत (रुपयात व सर्व करांसहित)

६) उत्पादकाच्या ग्राहक सेवा केंद्राच्या प्राधिकाऱ्याचे नाव, पत्ता, मदत/सेवा क्रमांक व ई-मेल ॲड्रेस.

वरील कोणत्याही बाबींचा उल्लेख आवेष्टीत वस्तुवर करण्यासाठी स्टिकर लावणे बेकायदेशीर आहे.

※ खरेदी करताना रोखीची पावती घ्या. पावतीचा उपयोग खरेदी व्यवहारात आपल्यावर अन्याय झाल्यास त्याचे निवारण करण्यासाठी अतिशय उपयुक्तपणे करता येतो.

※ आवेष्टीत वस्तु खरेदी करतांना त्या वस्तुवरील छापील अधिकतम किरकोळ किंमतीपेक्षा जास्त दराने ती वस्तु खरेदी करु नका. आवेष्टीत वस्तु छापील किंमतीपेक्षा अधिक दराने विकणे हा गुन्हा आहे.

※ आवेष्टीत वस्तुवरील छापील किरकोळ विक्री किंमत खोडणे किंवा कमी असलेली किरकोळ विक्री किंमत खोडुन जास्तीची विक्री किंमत छापणे / लिहिणे हा कायद्याने गुन्हा आहे.

※ ज्या व्यापाऱ्यास व्हॅट किंवा टर्न ओव्हर टॅक्स लागु असेल व तो ग्रॅम/किलोग्रॅम किंवा मिली/लिटर मध्ये परिमाण असणाऱ्या अथवा दोन्हीमध्ये परिमाण असणाऱ्या आवेष्टीत वस्तुंची विक्री करत असेल तर त्या व्यापाऱ्याने दुकानामध्ये इलेक्ट्रॉनिक वजनकाटा ठेवणे बंधनकारक आहे. ग्राहक हा त्या दुकानात खरेदी केलेल्या आवेष्टीत वस्तुंचे वजन तपासुन घेऊ शकतो. वजन तपासणीसाठी दुकानदार कोणताही दर आकारु शकत नाही.

※ आवेष्टीत वस्तुच्या जाहीरातीमध्ये किरकोळ विक्री किंमत छापलेली असल्यास सदरची किरकोळ विक्री किंमत ज्या आकारात (Font size) छापलेली असेल त्याच आकारामध्ये निव्वळ परिमाण छापणे बंधनकारक आहे.

वरीलपैकी कोणत्याही बाबीचे उल्लंघन आढळल्यास अशा दुकानदारांवर कारवाई करण्यासाठी स्थानिक निरीक्षक, वैध मापनशास्त्र कार्यालयास संपर्क साधावा.

**हे ग्राहकराजा... तु तक्रार निवारण्याचा हट्ट धर !**

# धन्यवाद

संजीव कवरे,
सहाय्यक नियंत्रक, वैध मापनशास्त्र,
जिल्हा लातुर व उस्मानाबाद